**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८५/२०२१</u>**
**<u>निशाणी क्र. ४१ सोबत.</u>**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>**
<u>नाव - आण्णासो गणपती चव्हाण वय – ६७</u>

**<u>शपथेवर साक्षीदारचा उलटतपास प्रतिवादी नं. १ व २ तर्फे विधिज्ञ व्ही. बी. पाटील यांचे मार्फत पुढे सुरू--</u>**

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, माझा गट क्रं ३४२ आणि प्रवादीचा गट क्रं ४२२ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या गट क्रंमाकाच्या पश्चिमेला गट नं. ४२२ येतो. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.३४२ व गट नं. ४२४ च्या मध्ये गट नं. ४२२ आहे. गट नं.४२४ हि गायरान जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मिळकतीतून गायरान जमीनीत जायचे झाल्यास प्रतिवादीच्या मिळकतीतून जावे लागते. आता साक्षीदारास नगरभुमापन कार्यालय, हातकणंगले यांचेतर्फे काढण्यात आलेला गट नं. ४२२ चा नकाशा दाखविण्यात आला. सदर नकाशा गट नं. ३४२ व ४२४ मध्ये गट नं. ४२२ दिसत असला तरी तो चुकीचा आहे. सदर नकाशा बाबत मला माहिती नसलेने मी त्याबाबत कुठेही तक्रार केलेली नाही. मला लिहीता वाचता येते.
प्रश्न - सदर नकाशामध्ये ३४२ ची हद्द ४२४ ला दाखविलेली नाही ?
उत्तर - नकाशा चुकीचा आहे.
प्रश्न - सदर नकाशा चुकीचा असलेबाबत दुसरा कागदोपत्री पुरावा अथवा नकाशा सादर केलेला आहे काय ?
उत्तर - मी माझा मोजणीचा नकाशा दाखल केलेला आहे.
हे म्हणणे खरे नाही की गट नं. ३४२ ला लागून गट नं. ४२४ ही गायरान जमीन असलेचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ३४२ मधून गट नं. ४२४ मध्ये जाणेसाठी कोणताही रस्ता अस्तित्वात नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तलाठी ला हाताशी धरून मी खोटा नकाशा सादर केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं ४२२ ही पूर्वी पासून प्रतिवादी १ व २ कसत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ४२२ मधून जाण्याचा आम्हाला कोणताही कायदेशीर हक्क अधिकार नाही. हे म्हणणे

खरे नाही की, प्रतिवादीना त्रास देण्यासाठी खोटा नकाशा सादर केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीना कोणताही आर्थिक पाठबळ नसलेचा फायदा घेऊन मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीनी गट नं. ३४२ मध्ये कधीही हरकत अडथळा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जाबाब देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**प्रवादी नं. ३ विरूध्द एकतर्फा असलेने उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

स्वाक्षरी /-

पेठ-वडगांव (**श्रीनिवास अ. कुलकर्णी**)

दिनांक. २०/०२/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठवडगांव.